PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 3, ISSUE 4

# छत्रपती शिवाजी महाराजांचे सरदार बाळाजीराव व चांदजीराव पाटणकर यांना पाठवलेले इ. स. १६७८ चे सांत्वनपर पत्र

**अमोल दिनकर गायकवाड**
पीएच.डी. संशोधक विद्यार्थी,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे.
**महाराष्ट्र भारत**

## प्रस्तावना:

इतिहास म्हणजे राजेराजवाडयांची वंशावळ, सनावळयांची जंत्री नसते. तर त्या त्या काळातील सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक घटनांचा आढावा पुरातत्वीय, कागदपत्रांच्या पुराव्यांच्या आधारे केलेले विश्लेषण म्हणजे इतिहास होय. भारतात जे काही स्वकीयांनी इतिहासलेखन केलेले आहे, ते वैज्ञानिक पातळीवर टिकू शकत नाही. कारण या लिखाणामध्ये काहीअंशी वस्तुनिष्ठतेचा अभाव दिसून येतो. अनेक इतिहासकारकांनी केलेले लेखन हे काही तरी मिळेल या आमिषांने केलेले दिसून येते. त्यामुळे आपणांस मोगल काळातील रोजनामे, काही बखरी, परकीय प्रवाशांची प्रवासवृत्ते, दरबारी असणारे परकीय वकिलांचे रिपोर्ट तसेच इंग्रज इतिहासकारकांनी लिहिलेल्या वृत्तांतावर अवलंबून रहावे लागते. इतिहासामध्ये नवीन पुराव्यांची उपलब्धता आणि सिद्धतेबरोबर ऐतिहासिक सत्याचे पुनर्निधारण होऊ शकते. त्याचप्रमाणे नवीन विचारप्रणाली निर्माण होऊन इतिहासाला नवीन संदर्भ लाभतात.



मराठीत लिप्यांतर:

| | |
|---|---|
| रा.श. ४ पिंगल | श. १५९९, माघ शु. १२ |
| माघ शु. द्वादशी | इ. १६७८, जानेवारी २४ |

श्री

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शक ४ पिंगल नाम संवत्सरे माघ शुध्द द्वादशी गुरूवासरे क्षत्रिय कुलावतंस श्रीराजा शिव छत्रपति याणी बालाजीराऊ व चांदजीराऊ प॥ पाटण यासी आज्ञा केली ऐसीजे. तुम्ही पत्र पाटविले ते पावले कितेक आपले वर्तमान त॥ जे लिहिले ते कलो लोक आहा. तुम्हावरी स्वामीची कृपा आहे. झगडीयात येसवंतराऊ पडला तरी त्याची आयुष्य मर्यादाच तितकी त्यास काय करावे तुम्ही त्याचे मुलांचा समाचार घेत जाणे. त्यांचे जित्रब त्याचे मुलास करार करून पूर्वीचे पत्रे पाठविली आहे ती व र॥ अनाजी पंतापासी असतील. समाचार घेउनू त्याप्रमाणे चालवणे. आपले समाधान असो देणे येविशी रा आनाजीपंतास पत्र लिहिले असे लेखनालंकार. मर्या देयं विराजते.

शिवछत्रपतींची स्वराज्य निर्मिती मागील भूमिका ज्यांनी स्वीकारली, त्यांनी शिवछत्रपतींना मनोमन साथ दिली. अशी साथ देणारी जी काही मोजकी घराणी महाराष्ट्रात होती, त्यापैकी एक कोयना खोऱ्यातील साळुंखे ऊर्फ पाटणकर घराणे होय. शिवपूर्वकाळात महाराष्ट्रातील देशमुख घराण्यांना समाजात मोठी प्रतिष्ठा होती. देशमुख हा परगण्यातील सर्वात मोठा वतनदार समजला जाई. परगण्याचा जणू तो राजा म्हणूनच राहत असे. स्वतःचे वाडे, स्वतःचे सैन्य बाळगून आपल्या परगण्यात राजासारखा तो वावरत असे. शेजारच्या परगण्यातील देशमुख मंडळीशी त्यांचे संघर्ष चालू असत. अनेकदा सुलतानाची सत्ताही तो जुमानत नसे. अशा या देशमुख वतनदारांच्या प्रदेशात शिवाजी महाराजांना स्वराज्याचा प्रयोग यशस्वी करावयाचा होता. त्यासाठी साम—दाम—दंड—भेद अशी नीती त्यांनी अवलंबिली.

इ.स. १६५९साली झालेल्या अफझलखान वधानंतर शिवाजी महाराजांनी वाई—प्रतापगडापासून कोल्हापूर—पन्हाळयापर्यंतचा प्रदेश स्वराज्यात सामील करून घेतला, त्यावेळीच कोयना खोरे व तेथील वतनदार पाटणकर देशमुख स्वराज्यात रूजू झाले, तथापि आपणास या काळातील पाटणकर घराण्यासंदर्भातील कागदपत्रे मिळत नाहीत. शिवाजी महाराजांनी सरदार पाटणकर यांना लिहिलेले इ.स. १६७८चे एकमेव पत्र उपलब्ध आहे. त्यावरून छत्रपती शिवाजी महाराजांनी काढलेल्या दक्षिण द्विग्विजय मोहिमेमध्ये यशवंतराव, बाळाजीराव आणि चांदजीराव पाटणकर या पाटणकर घराण्यातील कर्तबगार व्यक्तींनी सहभाग घेतला होता. या पैकी यशवंतराव हे युध्दात

मारले गेले. तेव्हा राज्याभिषेक शक ४, पिंगल नाम संवत्सर, माघ शुध्द द्वादशी गुरूवासरे (दि. २४ जानेवारी, १६७८) रोजी छत्रपती शिवाजी महाराजांनी बाळाजीराव व चांदजीराव पाटणकर यांना सांत्वनपर पत्र लिहिले. या पत्रात ते म्हणतात, '......श्रीराजा शिव छत्रपति याणी बालाजीराऊ व चांदजीराऊ पाा पाटण यासी आज्ञा केली ऐसीजे. तुम्ही पत्र पाटविले ते पावले कितेक आपले वर्तमान ताा जे लिहिले ते कलो आले. ऐसियास तुम्ही मानाचे धणी वतनी लोक आहा......'. या मजकुरावरून पाटणकर यांना स्वराज्य काळात वतनदार देशमुख म्हणून मोठी प्रतिष्ठा होती हे लक्षात येते.

या पत्रात छत्रपती शिवाजी महाराज पुढे म्हणतात, '...... झगडीयात येसवंतराऊ पडला तरी त्याची आयुष्य मर्यादाच तितकी त्यास काय करावे तुम्ही त्याचे मुलांचा समाचार घेत जाणे. त्यांचे जित्रब त्याचे मुलास करार करून पूर्वीच पत्रे पाठविली आहे ती व रा आनाजी पंतापासी असतील समाचार घेऊनू त्याप्रमाणे चालवणे आपले समाधान असो........'.

या सांत्वनपर पत्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांना यशवंतराव पाटणकर यांच्या मुलाविषयी जी तळमळ होती ही दिसून येते. त्यांना भविष्यात कोणत्याही समस्या येऊ नयेत म्हणून त्यांना पूर्वीची इनामे कायम करण्यात आलेली दिसून येतात. या लढाईत यशवंतराव पाटणकर धारातीर्थी पडले. परंतु, ही लढाई केव्हा, कुठे किंवा कुणाशी झाली, हे समजून येत नाही. पण ज्या अर्थी छत्रपती शिवाजी महाराजांनी आस्थेने सांत्वनपर पत्र पाठवले आहे, त्या अर्थी ही लढाई स्वराज्य रक्षणासाठी अथवा कर्नाटक मोहिमेतील स्वराज्यवृध्दीसाठी घडून आली असावी, असा आपण

तर्क करू शकतो. एखादा एकनिष्ठ वतनदार स्वराज्याच्या सेवेत खर्ची पडला असता छत्रपती शिवाजी महाराज त्यांच्या आप्तांची व कुटुंबियांची कशी काळजी घेत होते, हेही दिसून येते.

## उपसंहार:

या पत्रावरून असे दिसते की, या पत्राची भाषा ही प्रशासकीय नाही, तर या भाषेमध्ये ममत्व दिसते. मानाचे वतनदार म्हणून त्यांना स्वराज्यात असणारी प्रतिष्ठा दिसून येते. तसेच एकनिष्ठ वतनदार स्वराज्याच्या सेवेत खर्ची पडला, तर छत्रपती शिवाजी महाराज त्याच्या आप्तांची व कुटुंबियाची किती काळजी घेत होते, हे दिसून येते. थोडक्यात छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात पाटण परगण्यातील सरदार पाटणकर घराण्यास किती प्रतिष्ठा व मानसन्मान होता, हे आपणांस दिसून येतो.

## संदर्भ:

१. खोबरेकर व्ही.जी. (संपा.), *शिवकालीन कागदपत्र पृ. १७३*, मुंबई पुराभिलेख विभाग, मुंबई

२. चव्हाण डी.डी., *'क्षत्रिय कुलावंतस चालुक्य–सोळंखी–साळुंखे उर्फ श्रीमंत सरदार पाटणकर घराण्याचा इतिहास'*, श्रीराम प्रकाशन, पाटण, द्वितीय आवृत्ती २०१४.